


अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. ७ एप्रिल २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १८८ वा किंमत : ५ रुपये पाने १२

**आजचा सामना**

मुंबई इंडियन्स वि.दिल्ली कॅपिटल्स्

वेळ : ७.३० वा. स्थळ : मुंबई

## भाजपाचा दोन वर्षापासून बेरजेचा 'बी प्लॅन' तयार!

✔ विशेष प्रतिनिधी/मुंबई

**माढा लोकसभा २०२४ च्या लढतीत अकलूजचा मोहिते पाटील परिवार आपल्याला साथ देणार नाही याचा अंदाज भारतीय जनता पक्षाला दोन वर्षापासून होता आणि त्यादृष्टीने महाराष्ट्रातील भाजपाचे सर्वेसर्वा देवेंद्र फडणवीस यांनी 'बी प्लॅन' तयार करून मोर्चेबांधणी केली होती, अशी माहिती समोर आली आहे. मोहिते पाटलांची वजाबाकी झालीय पण 'हच्च्याला' सहा आमदार शिवाय भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) हा तीनचा गुणाकार, असा हा बी प्लॅन आहे.**

PLAN B

माढा लोकसभेची निवडणूक मोहिते पाटील यांच्या शिवाय लढवावी लागेल, त्यादृष्टीने मतदारसंघातील मोहिते पाटील वगळता अन्य नेत्यांची मोळी बांधण्याची सूचना देवेंद्र फडणवीस यांनी विद्यमान खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना केली होती आणि त्यादृष्टीने निंबाळकर यांनी गेल्या दोन वर्षापासून या बी प्लॅनची अंमलबजावणी सुरू केली होती.


माढा लोकसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधी आणि प्रमुख नेत्यांच्या बैठकीत खुद्द देवेंद्र फडणवीस यांनीच हा गौप्यस्फोट केलाय! या मतदारसंघातले सहा आमदार आपल्यासोबत आहेत, इतर नेत्यांचीही मोळी बांधली आहे. शिवाय या मतदारसंघातील भाजपाचाच उमेदवार विजयी होण्यासाठी मी स्वत: लक्ष घालणार असल्याचेही सांगत माढ्याची जागा प्रतिष्ठेची असल्याचे सूतोवाचही केले.

उमेदवारीवरुन नाराज झालेल्या अकलूजकर मोहिते-पाटील यांनी भाजपाविरोधात बंडखोरी करुन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची तुतारी घेऊन माढ्याच्या आखाड्यात उतरण्याच्या हालचाली मोठ्या प्रमाणात वाढविल्यानंतर भाजपाच्या गोटातदेखील घडामोडींना वेग आला आहे. मुंबईस्थित उपमुख्यमंत्र्यांच्या सागर बंगल्यावर मोहिते-पाटील वगळता माढा मतदार संघातील सर्व नेतेमंडळींची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेऊन इथली निवडणूक लढण्यासाठी नेतेमंडळींना सज्ज करत 'आक्रमण' असं फर्मान सोडलं. मोहिते-पाटील यांच्या विरोध्दात माढ्याच्या महासंग्रमावर लढताना त्यांनी रणनितीचा गृहपाठदेखील या नेतेमंडळींना दिला.

धैर्यशील मोहिते-पाटील यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. मोहिते-पाटील यांचा पक्ष प्रवेश आणि माढ्यातून लढण्याचा निर्णय झाल्याचं समोर आल्यानंतर माढा लोकसभेच्या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैंठक घेतली.

माढ्याचे आमदार बबनराव शिंदे, करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे, माणचे आमदार जयकुमार गोरे, माजी आमदार प्रशांत परिचारक, सहकार शिरोमणी कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे, सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे आदी प्रमुख नेतेमंडळी यावेळी उपस्थित होती. खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या विजयासाठी भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि एकनाथ शिंदे शिवसेना गटाच्या सर्व नेतेमंडळींनी निवडणुकीच्या कामात स्वत:ला झोकून द्यावे. मोहिते-पाटील यांच्याशिवाय इथली निवडणूक लढताना नाईक-निंबाळकर यांच्या पाठिशी मोठे मताधिक्य उभारुन भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि एकनाथ शिंदे शिवसेना गटाच्या नेतेमंडळींनी आपल्या नेतृत्वाची ताकद दाखववावी, असे आवाहन फडणवीस यांनी यावेळी केले.

## मोहिते-पाटील वजा, हच्च्याला सहा, तीनचा गुणाकार!!



### मैं हू ना..!

*मोहिते-पाटील हे आपल्यासोबत नसतील हे खूप अगोदरपासूनच माहिती होतं. त्यांच्या पश्चात माढ्याची लोकसभा लढताना तसेच मतदार संघात भाजपचं अस्तित्व कायम राखण्यासाठी 'बी' प्लॅन तयार करुन तशी मोर्चेबांधणी करण्यास खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना सांगितलं होतं. मागील दीड-दोन वर्षात त्यांनी ते केलंदेखील. मोहिते-पाटील वगळता सगळ्यांची मोळी बांधली गेली आहे. या मतदार संघात तब्बल सहा आमदारांची भाजपच्या उमेदवाराला मदत होणार आहे. काळजी करण्याचं कोणताही कारण नाही. तरीपण माढा आणि सोलापूरच्या उमेदवार निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करा, हवी ती मदत करायला मी तयार आहे. या दोन्ही जागांवर माझे लक्ष असणार आहे. इथल्या दोन सीटस् लागल्या पाहिजेत असं उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.*



### रणजितदादांना सक्रीय करा अन्यथा....



मोहिते-पाटील कुंटुंबियांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश झाल्यानंतर ते या गटाचं तुतारी हे चिन्ह घेऊन माढा लोकसभेच्या मतदार संघात निवडणूक लढविणार आहेत. तशी तर त्यांनी या मतदार संघात खूप अगोदरपासून तयारी सुरु केली आहे. यादरम्यान आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी तटस्थ राहणं योग्य होणार नाही. निवडणूक प्रचाराच्या रणधूमाळीत त्यांच्याबद्दल वेगळा मेसेज मतदार संघात जाईल, रणजितसिंह मोहिते-पाटील हे आतून 'तुतारी' सोबतच आहेत, असा बोलबाला होईल. त्यामुळे रणजितसिंह मोहिते-पाटील यांना महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारात अत्यंत सक्रीय करा, असं या मतदार संघातील नेत्यानी देवेंद्र फडणवीस यांना आग्रहानं बैंठकीवेळी सांगितल्याची माहिती समोर आली आहे.

## फडणवीस-पवारांची चलाखी भारी अर्चना पाटलांची उमेदवारी न्यारी

✔ सचिन आपसिंगकर/प्रतिनिधी

**धाराशिव लोकसभा मतदारसंघात अखेर तुळजापूरचे भाजपा आमदार राणाजगतिजसिंह पाटील यांच्या पत्नी सौ. अर्चना पाटील यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाची उमेदवारी मिळाली. आपले पती भाजपात असताना त्यांना मिळालेली राष्ट्रवादीची उमेदवारी ही महायुतीमध्ये सध्या राज्यात भाजपचे सर्वेसर्वा देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी अजित पवार यांच्या अंतर्गत एकीचे प्रतिक आहे. ही जागा अगदी तशी तर शिवसेनेच्या वाट्याची होती. मात्र शिवसेनेला डावलून ही जागा राष्ट्रवादीच्या पदरात टाकण्याचे काम या जोडगोळीने केले आहे. राज्यात शिवसेनेच्या अनेक जागांवर शेवटच्या क्षणी उमेदवार बदलण्याचे जालीम प्रयोग झाले. याला सुध्दा फडणवीस-पवार यांचे दबावतंत्रच कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. धाराशीवची जागा सुध्दा फडणवीस-पवार यांच्या दबावतंत्रामुळेच अखेर राष्ट्रवादीच्या पदरात पडली आहे. 'धाराशीवच्या उमेदवारीत फडणवीस-पवारांची चलाखी भारी, अर्चना पाटलांची उमेदवारी न्यारी' अशीच चर्चा या मतदार संघात रंगत आहे.**




### फडणवीस-पवारांपुढं कोणाचे चालेना

धाराशीव जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असलेल्या व राज्यात कॅबिनेटमंत्री पद असतानाही व शिवसेनेमध्ये ज्यांच्या कायम शब्द झेलला जातो शिवाय राज्यामध्ये दीड वर्षापूर्वी सत्तांतर होताना झालेल्या ऑपरेशन लोटसमध्ये ज्यांनी सिहांचा वाटा उचलला त्या डॉ. तानाजी सावंत यांचा राजकीय प्रस्ताव डावलून शिवसेनेचा या मतदारसंघावरील दावा मोडीत काढण्यामध्ये पवार-फडणवीस यांनीच महत्वाची भूमिका बजावली. प्रा. डॉ. सावंत यांचं एवढे वलय आणि वजन असतानादेखील धाराशीव लोकसभेच्या उमेदवारीवेळी त्यांच्या प्रस्ताव बाजूला करण्यात आला.

### अजित पवारांची प्रतिष्ठा

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ओमराजे निंबाळकर यांचा पराभव हा प्रतिष्ठेचा विषय केला आहे. विजय शिवतारे यांचा जसा सांगून पराभव केला तसा सांगून पराभव करण्याचा पवार यांचा मनसुबा आहे. याला आणखी एक कौटुंबिक किनार आहे. राणा जगजितसिंह यांच्या आत्या या अजित पवार यांच्या पत्नी आहेत त्यामुळे सासुरवाडीकडील ही जागा जिंकण्याचा त्यांचा आटोकाट प्रयत्न असेल. त्यासाठी त्यांनी भाजपातून आयात केलेल्यांना उमेदवारी दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

या मतदारसंघात शिवसेनेला डावलण्यात आले असे म्हणता येईल. कारण या जागेची मागणी दस्तुरखुद्द राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी आपल्या पुतण्यासाठी केली होती. शिवसेनेला या मतदारसंघावर दावा सांगण्यासारखी पार्श्वभूमीसुद्धा होती. कारण या मतदारसंघात उमरगा आणि भुम, परंडा येथे शिवसेनेचे आमदार आहेत. त्यापैकी भुम, परंडयाला तर डॉ. सावंत यांच्या रूपाने मंत्रीपद लाभले आहे. त्यामुळे विकास निधीची राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणावर उधळणच या मतदारसंघात झाली होती. त्यामुळे शिवसेनेच्या उमेदवारी मागणीत दम होता.

पण या तुलनेत पाहिले गेले तर राष्ट्रवादीला ही जागा देण्याला संयुक्तीक कारण नव्हते. या मतदारसंघात राष्ट्रवादीचा एकही आमदार निवडूण आलेला नाही. आज धाराशीव लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीची उमेदवारी मिळालेल्या अर्चना पाटील यांचे पती राणाजगजितसिंह पाटील यांचा गत लोकसभा निवडणुकीत दारूण पराभव झालेला आहे. तसेच पाटील यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपात उडी मारलेली आहे. अर्चना पाटील यांना उमेदवारी देताना त्यांना राष्ट्रवादीत प्रवेश करावा लागला आहे. मात्र त्यांचे पती पाटील यांनी मात्र भाजप सोडलेली नाही. त्यामुळे पाटील हे भाजपात राहूनच महायुतीमधील सहभागी घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा प्रचार करणार आहेत. याचा अर्थ पाटील यांनी दोन्ही डगरींवर हात ठेवले आहेत. त्यांनी केंद्र आणि राज्यातील भारतीय जनता पक्षाची बलाढय ताकद



ओळखून भाजपा सोडण्याचा विचारही मनात आणलेला नाही. त्यांना आपला तुळजापूर मधील विरोधक महाविकास आघाडीचा नेता आहे याची जाणीव आहे. त्याचबरोबर राज्याच्या आगामी राजकारणात त्यांना भाजपलाच धरून राहायचे आहे. राज्याच्या राजकारणात महायुती झाली तरी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी या पक्षांचे अंतर्गत शह काटशहाचे राजकारण लपून राहिलेले नाही. तसेच काही जागांच्या बाबतीमध्ये मात्र उमेदवार निवडून आणण्यासाठी पक्ष बदल करून महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पुरेपुर आव्हान देण्याचाही प्रयत्न झाला आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात ज्याप्रमाणे अजित पवार यांनी ऐनकेन प्रकारे विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांच्या पराभवासाठी कंबर कसली असून त्यांनी शिवसेनेच्या शिवाजीराव अढळराव-पाटील यांना उमेदवारी देऊन उभे केले आहे. त्याच पद्धतीने अजित पवारांनी ओमराजेंचा पाडाव करणे हा सुद्धा राजकोय इर्षेचा विषय केला असून त्यामुळेच पवार आणि फडणवीस यांच्या संगनमताने राष्ट्रवादीची उमेदवारी अर्चना पाटील यांना दिल्याचे उघड होत आहे.

या मतदारसंघातील राजकीय समीकरणे पाहिली तर विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांना उमरगा, ओसा, भुम, परंडा, तुळजापूर, बार्शी या मतदारसंघातील पाच आमदारांच्या विरोधात लढावे लागणार आहे. त्यामुळे महायुतीने या मतदारसंघात आपले पक्षीय बलाबल लक्षात घेऊनच ही उमेदवारी अर्चना पाटील यांना दिल्याचे स्पष्ट होत आहे.

## तिकडं पालकत्व स्विकारलं; इकडं ढुंकूनही नाही पाहिलं



✔ शिवाजी भोसले/सोलापूर

**माढ्यातून लोकसभेची उमेदवारी नाकारल्यानं नाराज झालेल्या मोहिते-पाटील यांची मनधरणी करणं वगैरेचा विषय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाजूला केल्याचं स्पष्ट दिसलं. अकलूजजवळ इंदापूर इथं येऊन माजीमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्यासह त्याच्या गटाचं पालकत्व घेताना, फडणवीसांनी अकलूजकडं साधं ढुंकूनही पाहिलं नाही किंवा मोहिते-पाटलांबद्दल चकार शब्द काढला नाही. मोहिते-पाटील यांचा विषय त्यांनी भाजपसाठी 'क्लोज' केल्याचं मानलं जातंय.**

अकलूजकर मोहिते-पाटील हे तसं महाराष्ट्राच्या राजकारणातील बडं आणि प्रस्थापित घराणं. पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणात या घराणचं चांगलंच बलस्थान. या घराण्याची तिसरी पिढी राजकारणात. महाराष्ट्रात मोहिते-पाटील ब्रॅडचं वर्चस्व राहायला हवं असा या घराण्याचा अट्टाहास. त्यासाठी त्यांनी प्रत्येक वेळी राजकारणाच्या सोंगट्या टाकलेल्या. स्व. वसंतदादा पाटील यांचं नेतृत्व त्यांच्यासाठी जणू परीस स्पर्श ठरलेलं. त्यांच्या कृपाआशीर्वादातून मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्रभर आपल्या नेतृत्वाची क्षितीजं विस्तारलेली. पण बारामतीकर पवारांना त्यांचं हे वर्चस्व मान्य नसलेलं. त्यातून मोहिते-पाटील यांना जवळून घेऊन पवार काका-पुतण्याने त्यांना कात्रजचा घाट दाखविलेला. मोहिते-पाटील यांचं राजकारणातील साम्राज्य जणू खिळखिळं करुन टाकलेल. मोहिते-पाटील यांचे सोलापूर जिल्ह्यातील जेवढे विरोधक त्यांना आतून ताकद देऊन मोहिते-पाटील यांच्या विरोधात मैदानात उतरवलेलं.



दरम्यान, बारामतीकर पवार काका-पुतण्याकडून होणारी बेजारी थांबावी आणि राजकारणातील बस्तान कायम राहावं यासाठी त्यांनी बारामतीकर काका-पुतण्यापासून फारकत घेऊन भाजपच्या वळचणीला जाऊन 'कमळ' हातात घेतलेलं. भाजपात ते चांगले रमलेले. विधान परिषदेची आमदारकी, साखर कारखान्यास आर्थिक मदत, विविध विकास योजनांना मंजूरी, शिवरत्न कंस्ट्रक्शन कंपनीसाठी अच्छे दिन असं खूप काही मोहिते-पाटील यांनी भाजपकडून पदरात पाडून घेतलं. पण, लोकसभा निवडणुकीची माशी शिंकली. मागूनदेखील माढ्याची उमेदवारी भाजपानं नाकारल्यानं मोहिते-पाटील नाराज झाले. त्यांनी शक्तीप्रदर्शन करत भाजपाला आव्हान दिलं. माढा, सातारा, बारामती आणि सोलापूर येथील लोकसभेच्या जागा पाडू, तसेच करमाळा, माळशिरस इथल्या विधानसभेच्या सीटस्देखील पाडू असं ठासून सांगितलं.

मोहिते-पाटील यांची ही भूमिका शिस्तप्रिय भाजपाला बहूधा आवडली नसावी. उमेदवारीवरुनचा रुसवा काढण्याचे कोणतेच प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांनी केले नाहीत. उलट जी काही भूमिका घ्यायची आहे, ती मोहिते-पाटील यांनीच घ्यावी, असे फडणवीस यांनी सांगून निर्णयाचा चेंडू मोहिते-पाटील यांच्या पुढे सारला. साधारण एक लाखाहून जादाचं मताधिक्य देऊन भाजपचा उमेदवार निवडून आणणाऱ्या मोहिते-पाटील ब्रॅडचं माढा मतदार संघातील वलय लक्षात घेऊन भाजप नरमाईची भूमिका घेईल, आपली समजूत काढेल, न्याय देईल असा आत्मविश्वास मोहिते-पाटील गटाला होता. पण झालं ते उलटंच. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोहिते-पाटील यांना बाजूलाच केलं.



अकलूजपासून जवळ असलेल्या किंबहुना लोकसभा मतदार संघाच्या सरहद्दीवर आलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी अकलूजचा विषय डोक्यात घेतला नाही. मोहिते-पाटील यांचा नामोल्लेखही कोठे केला नाही.